0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) या कार्यालयाचे आदेश क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा.२०७, दि.१५/०३/२०१३.
२) मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. मुंबई या विभागाचे उपमहाव्यवस्थापक यांचे दिनांक २२/०३/२०१३ रोजीचे पत्र व त्यासोबतचा पृथ:करण अहवाल.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
सत्यमेव जयते
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा. ३५५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :२० /०४/२०१३.

### आदेश शुध्दीपत्र

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

या कार्यालयाचे वाचावे क्र.१ अन्वये पारित केलेल्या आदेशातील आदेश क्र. २ मध्ये, " शासनजमा करण्यात आलेला अनुदानीत दराचा पामतेलाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी " व आदेश क्र. ३ मध्ये, " उपरोक्त कार्यवाही करताना उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांनी उपरोक्त पामतेलाचा साठा संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांच्या नियतनामध्ये दर्शविण्यात यावा " असे नमूद केलेले आहे.

उपरोक्त वाचावे क्र. १ अन्वये आदेश पारित करण्यापुर्वी या कार्यालयाकडून जप्त असलेला पामतेलाचा साठा हा मानविय खाण्यास योग्य आहे किंवा कसे ? याची खातरजमा करण्याकरीता जप्त असलेल्या पामतेलाच्या साठ्यातील नमूने घेण्यात येवुन ते पृथ:करणासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचे प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. सदर नमून्यांचा प्राप्त झालेल्या पृथ:करण अहवालामध्ये " I am of the opinion that above sample palm oil (O-78) confirm to the standards of palm oil as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011", असे नमूद आहे.

उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करताना उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे अधिपत्याखालील पथकाने पोलिसांसमवेत शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालय क्र. ४१/फ-वाशी यांच्या

कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरीता पामतेलाच्या पिशव्यांमधील साठा वितरणासाठी देण्यात आला.

तथापी, वाचावे क्र. २ अन्वये मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. मुंबई या शाखेचे उपमहाव्यवस्थापक यांच्याकडून प्राप्त पत्रामध्ये जप्त पामतेलाचा साठा हा सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत केल्यास सामान्य जनतेच्या जीवीतास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे नमूद करुन त्यांनी पुराव्यादाखल पृथ:करण अहवालाची छायांकित प्रत सादर केली. सदर पत्रासोबतच्या मे. निकासु लॅब या खाजगी प्रयोगशाळेकडील क्र. अेएस ११११२७-२०१२, दिनांक ०७/१२/२०१२ रोजीच्या पृथ:करण अहवालामध्ये " The result marked with asterisk does not comply with the requirement for the respective test as prescribed under Rules 2.2.1(20) and 2.2.1(16) of the FSSAI ", असे नमूद आहे. सदर पृथ:करण अहवालाचे अवलोकन करता मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. मुंबई यांनी त्यांच्या अधिपत्याखालील मे. सुप्रिटेंडन्स कंपनी ऑफ इंडिया (प्रा.) लि. या सर्वेअर कंपनीमार्फत दिनांक ०५/१२/२०१२ रोजी पामतेलाचे नमूने घेवुन ते नमूद खाजगी प्रयोगशाळेत सादर करुन त्याचा पृथ:करण अहवाल दिनांक ०७/१२/२०१२ रोजी प्राप्त करुन घेतल्याचे दिसून येते. तथापी, मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. मुंबई या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ०२/०१/२०१३ ते २९/०१/२०१३ या कालावधीमध्ये झालेल्या तीन सुनावण्यांच्या दरम्यान सदरचे पृथ:करण अहवाल या कार्यालयास सादर केले नाही ही आश्चर्यजनक बाब आहे.

मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालानुसार जप्त पामतेलाचा साठा हा मानविय खाण्यास अयोग्य असल्याची बाब विचारात घेवुन उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालय क्र. ४१/फ-वाशी यांना निर्देशित केल्यानुसार अधिकृत शिधावाटप दुकानात तात्काळ वितरण थांबविण्याचे आदेश देण्यात आले व सदर अधिकृत शिधावाटप दुकानातील शिल्लक असलेला पामतेलाचा साठा या कार्यालयाच्या अखत्यारीतील कोपरी, ठाणे येथील गोदामात ठेवण्यात आला आहे.

सबब, या कार्यालयाचे वाचावे क्र.१ अन्वये पारित केलेल्या आदेशातील आदेश क्र. २ व ३ मध्ये या शुध्दीपत्रकानुसार सुधारणा करण्यात येत असून त्यामध्ये, " शासनजमा करण्यात आलेला अनुदानित दराचा शिल्लक असलेला पामतेलाचा साठा हा मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. मुंबई यांनी सादर केलेल्या पृथ:करण अहवालानुसार मानविय खाण्यास अयोग्य असल्याने, पोलीसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ,

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD OF ... MUMBAI

0003
ठाणे यांचे मदतीने सदरचा साठा मानविय खाण्याव्यतिरिक्त इतर व्यवसायिकांना साबण इ.च्या उत्पादनाकरीता प्रचलित दरानुसार विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी." असे वाचावे.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे मालक
२) मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे व्यवस्थापक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांना माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) कार्यासन अधिकारी, मागणी शाखा, का.क्र. २, प्रधान कार्यालय यांना माहिती व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
६) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.